**विशेष दिवाणी दावा क्रमांक – ५/२०१३**

**नि.क्र. १९० /क सोबत**

**उलटतपास शपथेवर सुरु**
**उलटतपास वादीतर्फे विद्वान वकील श्री. ए.टी. तांबे यांचे तर्फे सुरु :-**

१३. माझे ११ वी पर्यंत शिक्षण झाले आहे. माझे पतीचे शिक्षण ९ वी पर्यंत झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती कोणत्याही कागदावर सही करणेपूर्वी तो वाचुन बघुन सही करत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे पतीने वादीचे लाभात नोंदणीकृत करारपत्र लिहुन दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीला दावा मिळकत ही रक्कम रुपये २४,५०,०००/- इतक्या रक्कमेस खरेदी देणेचे करारपत्रानुसार ठरले होते. हे मला माहित नाही की, सदर करारपत्राच्या अनुषंगाने त्यांची फसवणुक झालेने कोठे तक्रार केली होती किंवा नाही. माझे पतीची कशी फसवणुक झाली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे पतीने कैफीयतीमध्ये फसवणुक झालेचे कथन केले आहे त्यावरुन मी सरतपासात फसवणुक झाल्याचा मजकुर लिहिला आहे. मी रजिस्टर करारपत्र लिहितेवेळी अगर वाटाघाटी करतेवेळी हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे मला रजिस्टर करारपत्राचे वेळी माझे पती व वादींच्या मध्ये काय वाटाघाटी झाल्या हे मला माहित नाही.

१४. माझ्या पतीला बहिण नाही. प्रतिवादी क्र.३ हे माझे भाऊ आहेत. माझा भावा ओंड ता, कराड येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल झालेनंतर व माझे पती या दाव्यात हजर झाले नंतर माझे पतीने प्रतिवादी क्र.३ च्या नावाने दावा मिळकतीचे खरेदीपत्र लिहुन दिले आहे. माझ्या भावाचे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा कराड येथे खाते असल्याबाबत मला माहित नाही. दावा मिळकतीच्या मोबदल्याची रक्कम माझ्या भावाने माझे पतीला रोख स्वरुपात दिली होती. नि.क्र.१२० चे खरेदीपत्रात मोबदल्याची रक्कम चेकने दिल्याचे नमुद केले आहे ते खोटे आहे. माझे पतीला रोख रक्कम रुपये ३०,००,०००/- मिळाले याबाबतची पावती मी या कामी दाखल करु शकत नाही. हे मला सांगता येणार नाही की, माझे पतीला रोख रक्कम रुपये ३०,००,०००/- कधीही मिळालेले नाहीत म्हणुन मी पावती हजर करु शकत

नाही. माझे पतीला रक्कम रुपये ३०,००,०००/- रोख मिळाले होते असे माझे जबाबात नमुद नाही. हे मला माहित नाही की, रजिस्टर करारपत्राप्रमाणे वादीच्या लाभात खरेदीपत्र करुन द्यायला लागु नये म्हणुन माझे पतीने प्रतिवादी क्र.३ च्या नांवे पोकळ खरेदीपत्र लिहुन दिले आहे.

१५. हे मला माहित नाही की, वादीने माझा भाऊ व पती विरुध्द सातबाराच्या उता-यातील तारखेमध्ये खाडाखोड केली म्हणुन तक्रार दाखल केली आहे. हे मला माहित नाही की, त्या केसमध्ये माझे पती व भाऊ आरोपी आहेत. हे मला माहित नाही की, माझे पतीने माझ्या भावाला लिहुन दिलेले खरेदीपत्र पोलिसांनी जप्त केले आहे. हे मला माहित नाही की, माझे पतीने नि.क्र.१२० चे खरेदीपत्रावेळी खोटा सातबारा उतारा तयार करुन दिला होता. दावा मिळकतीवर वर्धमान सहकारी संस्थेचे कर्ज व जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूर यांचे कर्ज होते हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीवर आयडीबीआय बँकेचे कर्ज होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती वर्धमान नागरी पतसंस्थेमध्ये संचालक होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे पतीने माझे भावाचे नांवे करुन दिलेले खरेदीपत्रामध्ये मोबदल्याची रक्कम रुपये ३०,००,०००/- नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, स्थावर मिळकतींच्या किंमती दरवर्षी वाढत असतात.

१६. हे म्हणणे खरे आहे की, माझे भावाने दावा मिळकत प्रतिवादी क्र. ५ ला विक्री केली आहे. त्या खरेदीपत्रामध्ये मोबदल्याची रक्कम किती दाखविली आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचे जे जे व्यवहार झाले ते माझे पतीने त्यांच्या हयातीत केले आहेत त्यावेळी मी हजर नव्हते. माझे पतीचे सांगणेवरुन दावा मिळकतीचा व्यवहार हा रक्कम रुपये ४०,००,०००/- चा होता असे सांगितले होते. सदर व्यवहाराची तारीख, वार व साक्षीदार इत्यादी तपशिल मला माहित नाही. मी वादीला ओळखत नाही. मी वादीला नावावरुन ओळखते. मी वादीला प्रत्यक्ष कधीही पाहिलेले नाही. मी वादीला सही करताना कधी पाहिलेले नाही.

१७. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१४५ च्या करारवर वादींना सही करताना मी पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.१४५ च्या करारावर वादीची सही आहे असे मी खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. १४५ चा करार माझे पती व वादी यांच्यामध्ये कधीही झालेला नव्हता. हे मला माहित नाही की, नि.क्र.१४५ चा करार माझे पतीने खोटा तयार केला आहे. नि.क्र. १४५ च्या कराराचे वेळी मी हजर नव्हते. हे मला माहित नाही की, रजिस्टर करारपत्राप्रमाणे खरेदीपत्र करायला लागु नये म्हणुन माझे पतीने नि.क्र.१४५ चा खोटा करार तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.१४५ चे मुळ करारपत्र वादीचे ताब्यात आहे असे मी खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.१४५ चा करार कधीही अस्तीत्वात नव्हता. नि.क्र.१४५ चे मुळ करारपत्र मी कधीही पाहिलेले नाही.

१८. मला माझे पती पैशाचे व्यवहाराबाबत कधीही सांगत नव्हते. वादीच्या लाभात लिहुन दिलेल्या रजिस्टर करारपत्रावरुन किती रक्कम माझे पतीला मिळाली हे मला सांगता येत नाही. मी रजिस्टर करारपत्र पाहिले आहे. हे मला माहित नाही की, त्या रजिस्टर करारपत्रात मोबदल्या शिवाय काय तपशिल लिहिला आहे. मी माझे पतीला सही करताना पाहिले आहे. मी माझ्या पतीची सही ओळखु शकते. नि.क्र. १०४ चे करारपत्र साक्षीदारास दाखविले असता त्यावरील लिहुन देणार म्हणुन असलेली सही त्याचे पतीची सही नसल्याचे सांगितले. नि.क्र.१०४ चे करारपत्राचे मागील बाजुस पैसे पोहोचल्याबाबतच्या सह्या दाखविल्या असता त्या सह्या माझ्या पतीच्या नाहीत असे साक्षीदाराने सांगितले. आता साक्षीदारास नि.क्र.१३ चे कैफीयतीवरील सही दाखविली असता सही माझे पतीची नाही असे तिने सांगितले. हे मला सांगता येणार नाही की, न्यायालयीन कर्मचा-यासोबत माझे पतीचा वाद होता किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला वर दाखविलेल्या सह्या माझ्या पतीच्या असताना देखील मी त्या त्यांच्या नाही असे खोटे सांगत आहे. माझे पतीला फसवुण केलेले करारपत्र मी पाहिले कि नाही हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीला खरेदीपत्र करुन द्यायला लागु नये म्हणुन माझे पतीला फसवुण रजिस्टर

करारपत्र करुन घेतले आहे असे मी खोटे सांगत आहे.

१९. दावा मिळकती शिवाय माझे पतीची इचलकरंजी महानगरपालिके लगत घर मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिळकतीस माझे पतीचे पश्चात वारस नोंदी करुन घेतल्या आहेत. सदर मिळकतीची किंमत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल करणेपूर्वी वादी व माझे पतीमध्ये झालेल्या नोटीसा व उत्तरी नोटीस याबाबत मला काही माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे शपथपत्रातील नोटीसीबाबतचा मजकुर ऐकीव माहितीच्या आधारे लिहिला आहे. हे मला माहित नाही की, माझे पतीला वादीकडून रक्कम रुपये २४,५०,०००/- दाव्यातील करारपत्राप्रमाणे पोहोचली आहे.

२०. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीवर झालेल्या फौजदारी केस बाबत मला माहिती नाही हे मी खोटे सांगत आहे. हे मला माहित नाही की, माझे पतीने कराराचा भंग केला म्हणुन वादीस हा दावा दाखल करणे भाग पडले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या लाभात खरेदीपत्र लिहुन द्यायला लागु नये म्हणुन प्रथम माझे पतीने माझे भावाला व त्यानंतर माझे भावाने प्रतिवादी क्र.५ ला पोकळ खरेदीपत्र करुन दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला काहीही माहिती नसताना खोटी कैफीयत दाखल करुन खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा. श्रवणोत्तर स्वीकृत्त,

Digitally signed by
GANI MANIK NADAF
Date: 2026.01.22
17:46:53 +0530

दिनांक – २१.१.२०२६

(जी. एम. नदाफ)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इचलकरंजी.